# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** मिंरजगाव
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0145 **Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**24/04/2026 00:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** गुरूवार
      **Time Period (कालावधी):** पहर 5
      **Date From (दिंनाक पासून):** 23/04/2026
      **Date To ( दिंनाक पर्यंत):** 23/04/2026
      **Time From (वेळेपासून):** 13:18 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 15:23 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
      **Date (दिंनाक ):** 23/04/2026 **Time (वेळ):** 23:45 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
      **Entry No. (नोंद क्र.):** 002
      **Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 24/04/2026 00:09 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
      उत्तर, 2 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** नटराज ज्युस सेंटर, क्रांती चैक, मिरजगाव,कर्जत

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
      **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
      **District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** अजित बाळकष्ण त्रिपुटे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1976

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, ,अहिल्यानगर,मिरजगाव ,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, ,अहिल्यानगर,मिरजगाव ,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8329701344

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दिपक सर्जेराव पवार | | | 1. मिरजगाव पोलीस स्टेशन,कर्जत, मिरजगाव ,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 5000/ रुपये लाचेची रक्कम 500 | 5,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | रु दराच्या 10 नोटा. | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिंयाद दिंनाक 23/04/2026

मी अजित बाळकृष्ण त्रिपुटे, वय 50 वर्षे, व्यवसाय-नोकरी, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं. 8329701344.

समक्ष सरकारतर्फे फिंयादी होवुन फिंयाद देतो की, आम्ही लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस उपअधीक्षक या पदावर दि. 27/08/2024 रोजी पासुन कार्यरत आहोत. दि.22/04/2026 रोजी आम्हास तक्रारदार श्री. निलेश कान्हु नवले यांनी संपर्क करून त्यांची लोकसेवका विरोधात लाचमागणीची तक्रार असल्याचे कळविले व लोकसेवक यांनी तक्रारदार यांना दि.23/04/2026 रोजी भेट घेण्याकरीता बोलविले असल्याचे कळविले. आम्ही त्यांना दि.23/04/2026 रोजी 12/00 वा. दरम्यान मिरजगाव येथील सुरक्षित ठिकाणी हजर राहणेबाबत सुचना दिली.

त्यानंतर आम्ही पंचायत समिती, अहिल्यानगर येथील दोन पंच साक्षीदार यांना आज दि.23/04/2026 रोजी उपलब्ध करून घेतले. पंच साक्षीदार ला.प्र.वि.कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना एका तक्रारदार यांची लोकसेवकाविरूध्द लाचमागणीची तक्रार असुन त्याप्रमाणे कारवाई करायची आहे, सदर कारवाईमध्ये आपण पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय याबाबत पंचांची संमती विचारली असता पंचांनी त्यास संमती दिली. तसेच आम्ही कार्यालयात हजर असलेले पोहेका शिंदे, पोका निमसे, पोका कराड, चापोहेका हारूण शेख यांना आमचे कार्यालयीन कक्षात बोलवुन दोन्ही पंचांची सापळा पथकाशी ओळख करून दिली. आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवश्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिशी शासकिय वाहन क्र. एमएच 16 सीव्ही 0919 या वाहनाने ला.प्र.वि.कार्यालयातुन 10/45 वा. निघुन 12/00 वा. दरम्यान मिरजगाव येथील सुरक्षित ठिकाणी पोहोचलो. त्यानंतर तक्रारदार यांनी आमचेशी संपर्क करून ते सदर ठिकाणी त्यांचेकडील दुचाकी वाहन क्र. एम एच 12 पीएक्स 2544 या वाहनाने आम्ही थांबलो त्या ठिकाणी आले. आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तक्रारदार यांना त्यांचे नाव पत्ता व तक्रार विचारली असता तक्रारदार यांनी त्यांचे पुर्ण नाव निलेश कान्हु नवले, वय 31 वर्षे, धंदा- शेती व पत्याचा क्लब चालविणे, रा. मिरजगाव, ता.कर्जत, जि.अहिल्यानगर असे सांगुन त्यांची तक्रार सांगितली की, '' मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहण्यास आहे. मी मिरजगाव येथे पत्याचा क्लब चालवुन माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो. दि. 22/04/2026 रोजी मिरजगाव पोलीस स्टेशन येथील नेमणुकीचे श्री. पवार, पोलीस हवालदार यांनी माझी भेट घेवुन '' तुझा पत्याचा क्लब सुरळित चालु ठेवायचा असेल व क्लबवर कारवाई होवु दयायची नसेल तर तुला मला 5,000/-रुपये दर महिन्याला हप्ता म्हणुन दयावे लागतील, मला पैसे दिले नाही तर मी माझ्या बिटात तुझा क्लब चालु देणार नाही, तुझ्या क्लबवर कारवाई करेल, उदया मला हप्त्याचे पैसे आणुन दे '' असे म्हणुन माझ्याकडे लाचेची मागणी केली. मी त्यांना सध्या क्लब चांगला चालत नाही, गिऱ्हाईक जास्त नाही, मला हप्त्याचे पैसे दयायला परवडणार नाही असे म्हणालो. श्री. पवार पोलीस यांनी यापुर्वीही वेळोवेळी माझ्या क्लबवर कारवाई न करण्याच्या मोबदल्यात मला रक्कम देण्यास भाग पाडले आहे. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. मी आज दि. 23/04/2026 रोजी श्री. पवार पोलीस यांची भेट घेणार आहे. त्यावेळी त्यांनी माझेकडे माझा पत्यांचा क्लब सुरळित चालु ठेवण्यासाठी व क्लबवर कारवाई न करण्याच्या मोबदल्यात हप्ता म्हणुन लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कारवाई करावी. माझ्यात व पवार पोलीस यांचेत कोणत्याही प्रकारचा उधारी उसणवारीचा व्यवहार

नाही. तसेच भांडणतंटा अगर वैर नाही. पवार पोलीस यांनी लाचेची मागणी केल्यास सदरची रक्कम मी माझ्या बचतीतुन हजर करील.'' अशी तक्रार सांगितली. आम्ही तक्रारदार यांची तक्रार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. सदर तक्रारीवर तक्रारदार, आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर तक्रारदार श्री. नवले यांचे तक्रारी प्रमाणे लोकसेवक पवार, पोलीस हवालदार यांची लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हा◌ॅईस
रेका◌ॅ
ड
रचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवुन त्याच्या वापराबाबत तक्रारदार श्री. नवले◌े यांना व दोन्ही पंचांना माहिती स
त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी व्हा◌ॅईस
रेका◌ॅ
ड
र मधील तक्रारदार व लोकसेवक पवार यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, लोकसेवक पवार यांनी तक्रारदार आम्ही तक्रारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास कळविले असता, त्यांनी त्यांचे बचतीतुन 5,000/- रक्कम त्यात 500 रुपये दराच्या 10 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांचे नंबर कोऱ्या कागदावर लिहण्यात आले. तो कागद पंच नं. 2 यांचे कडे देण्यात आला. आम्ही सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हा◌ॅयलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोका◌ॅ निमसे यांनी करुन दाखविले. तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. सदर लाच रक्कम तक्रारदार यांचे शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर आम्ही तक्रारदार, दोन्ही पंचाना व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या. आम्ही तक्रारदार व पंच नं. 1 यांना कळविले की, त्यांनी मिरजगाव पोलीस स्टेशन येथे जावुन लोकसेवक पवार यांची भेट घ्यावी. पवार यांनी लाचेची रकमेची मागणी केल्यास तक्रारदार यांनी त्यांचे शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम पवार यांना दयावी व लाच स्विकारले नंतरचा इशारा करावा असा व इतर पुरक सुचना देण्यात आल्या. पोका◌ॅ निमसे यांनी व्हा◌ॅईस
रेका◌ॅ
ड
रमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन ते व्हा◌ॅईस रेका◌ॅर्डर चालु करून तक्रारदार यांचे गळयात शर्टच्या आत अडकविले. तक्र तरी दिंनाक 23/04/2026 रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान 13/18 ते 13/42 वाजेच्या दरम्यान मिरजगाव पोलीस स्टेशन, जि.अहिल्यानगर येथे लोकसेवक पवार , पोलीस हवालदार यांनी तक्रारदार श्री. नवले यांचेकडे त्यांचा पत्याचा क्लब सुरळित चालु ठेवण्यासाठी व क्लबवर कारवाई न करण्याच्या मोबदल्यात 5,000/-रुपये लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली व दिंनाक 23/04/2026 रोजी 15/05 ते 15/23 वा. दरम्यान लाचेच्या सापळा कारवाई वेळी नटराज ज्युस सेंटर, क्रांती चैक, मिरजगाव येथे लोकसेवक पवार यांनी तक्रारदार यांचेकडुन 5,000/-रुपये लाचेची रक्कम स्विकारून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले म्हणुन यातील लोकसेवक दिपक सर्जेराव पवार, वय 39 वर्षे, पोलीस हवालदार बक्कल नं. 1625, नेमणुक मिरजगाव पोलीस स्टेशन, ता.कर्जत, जि.अहिल्यानगर, रा. रातांजन रोड, श्री. मेहेत्रे यांचे घरात भाडयाने, मिरजगाव, ता.कर्जत, जि. अहिल्यानगर यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिंयाद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Vijay Kisan Zanjad(I (Inspector)) / PCMAH87365

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): **or** (किंवा)

**Rank** (पद):

**No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Vijay Kisan Zanjad
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMAH87365

<u>General Diary Details</u>
<u>ठाणे दैनंदिनी तपशील</u>

**State (राज्य):** महाराष्ट्र

**District (जिल्हा):** अहिल्यानगर

**P.S. (पोलीस ठाणे):** मिरजगाव

**1. G.D. No. (ठाणे दैनंदिनी क्र.):** 004

**2. G.D. Date & Time (ठा. दै. दिनांक आणि वेळ):** 24/04/2026 00:52 वाजता

**3. G.D. Type (ठाणे दैनंदिनी प्रकार):** इतर

**4. Entry for (officer) (करिता नोंद(अधिकारी )):** PabodhAnnasahebHanche /पोलीस हवालदार

**5. Case Type (प्रकरणाचा प्रकार) :**

**6. G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**

यावेळी आम्ही पो.ठाणे अंमलदार नोंद घेतो की,मिरजगाव पो.स्टे गु.रजि.नं.145/2026 भ्रष्टाचार प्रतिबध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे दाखल गुन्ह्या हा नोंदणी मध्ये भरताना फिंयादी मधिल मजकुर मोठ्या प्रमाणात असल्याने सदरची फिंयाद पुर्णपणे समाविष्ट झालेली नसल्याने फिंयाद ची छायांकित प्रत सी.सी.टि.एन एस प्रती सोबत जोडलेली आहे करिता नोदं.

**7. G.D. Subject (ठा. दै. चा विषय):**

नोंद.

**8. Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| Sr.No. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

**Report Printed on**
**(अहवाल मुद्रित केलेला दिनांक):** 24/04/2026

**Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):**

**Name (नाव):** Vijay Kisan Zanjad

**Rank (पद):** I (Inspector)

**Signature of G.D. Entry By (ठा. दै. नोंद करणाऱ्याची सही):**

पोलीस निरीक्षक
मिरजगाव.पो स्टेशन

**Name (नाव):** Vijay Kisan Zanjad

**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):** PCMAH87365

फिर्याद

दि. 23/04/2026

मी अजित बाळकृष्ण त्रिपुटे, वय 50 वर्षे, व्यवसाय–नोकरी, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर, मो.नं. 8329701344.

समक्ष सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे पोलीस उपअधीक्षक या पदावर दि. 27/08/2024 रोजी पासुन कार्यरत आहोत. दि.22/04/2026 रोजी आम्हास तकारदार श्री. निलेश कान्हु नवले यांनी संपर्क करून त्यांची लोकसेवका विरोधात लाचमागणीची तकार असल्याचे कळविले व लोकसेवक यांनी तकारदार यांना दि.23/04/2026 रोजी भेट घेण्याकरीता बोलविले असल्याचे कळविले. आम्ही त्यांना दि.23/04/2026 रोजी 12/00 वा. दरम्यान मिरजगाव येथील सुरक्षित ठिकाणी हजर राहणेबाबत सुचना दिली.

त्यानंतर आम्ही पंचायत समिती, अहिल्यानगर येथील दोन पंच साक्षीदार यांना आज दि.23/04/2026 रोजी उपलब्ध करून घेतले. पंच साक्षीदार ला.प्र.वि.कार्यालयात हजर झाल्यानंतर आम्ही त्यांना एका तकारदार यांची लोकसेवकाविरूध्द लाचमागणीची तकार असुन त्याप्रमाणे कारवाई करायची आहे, सदर कारवाईमध्ये आपण पंच म्हणुन काम करण्यास तयार आहात काय याबाबत पंचांची संमती विचारली असता पंचांनी त्यास संमती दिली. तसेच आम्ही कार्यालयात हजर असलेले पोहेकॉ शिंदे, पोकॉ निमसे, पोकॉ कराड, चापोहेकॉ हारूण शेख यांना आमचे कार्यालयीन कक्षात बोलवुन दोन्ही पंचांची सापळा पथकाशी ओळख करून दिली. आम्ही सापळा पथकास सापळा कारवाईकामी आवश्यक असलेले सर्व साहित्य सोबत घेण्यास सांगुन आम्ही, दोन्ही पंच, सापळा पथकातील कर्मचारी असे सर्व साहित्यानिशी शासकिय वाहन क्र. एमएच 16 सीव्ही 0919 या वाहनाने ला.प्र.वि.कार्यालयातुन 10/45 वा. निघुन 12/00 वा. दरम्यान मिरजगाव येथील सुरक्षित ठिकाणी पोहोचलो. त्यानंतर तकारदार यांनी आमचेशी संपर्क करून ते सदर ठिकाणी त्यांचेकडील दुचाकी वाहन क्र. एम एच 12 पीएक्स 2544 या वाहनाने आम्ही थांबलो त्या ठिकाणी आले. आमचे सुचनेवरून दोन्ही पंचांनी तकारदार यांना त्यांचे नाव पत्ता व तकार विचारली असता तकारदार यांनी त्यांचे पुर्ण नाव निलेश कान्हु नवले, वय 31 वर्षे, धंदा– शेती व पत्याचा क्लब चालविणे, रा. मिरजगाव, ता.कर्जत, जि.अहिल्यानगर असे सांगुन त्यांची तकार सांगितली की, " मी वरील ठिकाणी कुटुंबासह राहण्यास आहे. मी मिरजगाव येथे पत्याचा क्लब चालवुन माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवितो. दि. 22/04/2026 रोजी मिरजगाव पोलीस स्टेशन येथील नेमणुकीचे श्री. पवार, पोलीस हवालदार यांनी माझी भेट घेवुन " तुझा पत्याचा क्लब सुरळित चालु ठेवायचा असेल व क्लबवर कारवाई होवु दयायची नसेल तर तुला मला 5,000/–रुपये दर महिन्याला हप्ता म्हणुन दयावे लागतील, मला पैसे दिले नाही तर मी माझ्या बिटात तुझा क्लब चालु देणार नाही, तुझ्या क्लबरवर कारवाई करेल, उदया मला हप्त्याचे पैसे आणुन दे " असे म्हणुन माझ्याकडे लाचेची मागणी केली. मी त्यांना सध्या क्लब चांगला चालत नाही, गिऱ्हाईक जास्त नाही, मला हप्त्याचे पैसे दयायला परवडणार नाही असे म्हणालो. श्री. पवार पोलीस यांनी यापुर्वीही वेळोवेळी माझ्या क्लबवर कारवाई न करण्याच्या मोबदल्यात मला रक्कम देण्यास भाग पाडले आहे. मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नाही. मी आज दि. 23/04/2026 रोजी श्री. पवार पोलीस यांची भेट घेणार आहे. त्यावेळी त्यांनी माझेकडे माझा पत्याचा क्लब सुरळित चालु ठेवण्यासाठी व क्लबवर कारवाई न करण्याच्या मोबदल्यात हप्ता म्हणुन लाचेची मागणी केल्यास त्यांचेविरूध्द कारवाई करावी. माझ्यात व पवार पोलीस यांचेत कोणत्याही प्रकारचा उधारी उसणवारीचा व्यवहार नाही. तसेच भांडणतंटा अगर वैर नाही. पवार पोलीस यांनी लाचेची मागणी केल्यास सदरची रक्कम मी माझ्या बचतीतुन हजर करील." अशी तकार सांगितली. आम्ही तकारदार यांची तकार त्यांचे स्वहस्ताक्षरात लिहुन घेतली. सदर तकारीवर तकारदार, आम्ही व दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली.

त्यानंतर तकारदार श्री. नवले यांचे तकारी प्रमाणे लोकसेवक पवार, पोलीस हवालदार यांची लाचमागणी पडताळणी करण्याचे ठरले. आम्ही लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हॉईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवुन त्याच्या वापराबाबत तकारदार श्री. नवले यांना व दोन्ही पंचांना माहिती समजावुन सांगितली. आमचे सुचनेप्रमाणे सापळा पथकातील पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याबाबत तकारदार व दोन्ही पंचांची खात्री करून दिली. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये तकारदार श्री.नवले यांनी दिलेल्या तकारीची पडताळणी करणेकामी आम्ही, दोन्ही पंच, तकारदार श्री. नवले असे उपस्थित असलेबाबत निवेदन रेकॉर्ड केले. त्यानंतर आम्ही लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाईबाबत तकारदार व पंच नं. 1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून ते तकारदार श्री. नवले यांचे गळ्यात कोणास दिसणार अशा प्रकारे अडकवन दिला. आम्ही दिल्या सचने प्रमाणे तकारदार व पंच नं 1 तकारदार नवले

यांच्या दुचाकी वाहनाने लोकसेवक पवार यांची भेट घेण्याकरीता मिरजगाव पोलीस स्टेशन येथे जाण्याकरीता 13/18 वाजता रवाना केले. त्यानंतर 13/42 वाजेच्या सुमारास तकारदार व पंच नं. 1 आम्ही थांबलो त्याठिकाणी परत आले. पोकॉ निमसे यांनी तकारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन बंद केले. आम्ही पंच नं. 1 यांना लोकसेवक पवार यांची भेट घेण्याकरीता रवाना केल्यापासुन परत येई पर्यंत घडलेल्या घटने विषयी पंच नं. 2 यांचे समक्ष विचारले असता त्यांनी सांगितले की, मी व तकारदार असे रवाना होउन मिरजगाव पोलीस स्टेशन येथे पोहोचलो. तेथे तकारदार व मी पोलीस स्टेशनमधिल एका कक्षासमोर थांबलो, तेथील एका कक्षाच्या दरवाज्यात एक इसम उभे होते, त्यांचेत व तकारदार यांचेत बोलणे चालु होते. त्यावेळी सदर इसम हें लोकसेवक पवार असल्याचे मला समजले. थोडया वेळाने लोकसेवक पवार यांनी तकारदार यांना बाहेर जाण्याचा ईशारा केला. त्यानंतर मी व तकारदार असे बाहेर आलो. थोडया वेळाने तकारदार यांनी त्यांचे मोबाईलच्या व्हॉट्सॲप मधुन लोकसेवक पवार यांना फोन केला असता पवार यांनी तकारदार यांना पोलीस स्टेशनला बोलविले. त्यानंतर तकारदार व मी पोलीस स्टेशन येथे गेलो. तेथे पवार यांनी तकारदार यांना काय म्हणतो असे म्हणाले असता तकारदार यांनी तेच बोलायचं होत फायनलं हप्त्याचं असे म्हणाले असता पवार यांनी **ठेवायचे इथे** असे म्हणाले. त्यावर तकारदार यांनी हप्ता नाही आणला मी असे सांगितले. त्यावर पवार यांनी तकारदार यांना ' **तुम्ही आधी म्हणल्या प्रमाणे त्या सगळया गोष्टी ॲडजेस्ट केल्या, इथं आता माझ्या माघं चार लोकं आहेत आपले, तुम्हाला पहिल्यापासुन सहा चे पाचच केले ना, माने कडुन सहा घेतलेत तुम्हाला माहिती आहे ना, इतक्यानं नाही कमी व्हायचं, तेवीस तारीख आली,** असे म्हणाले. तकारदार यांनी ' **धंदा पण इतका नाही'** असे म्हणाले असता पवार यांनी **माझ्याकडे मोजुन दहा बारा गाव आहेत, त्यातुन तुम्ही कमी म्हणल्यावर मला नाई जमायचं, वाढुन तर नाही, हाय तेव्हडे दया,** असे म्हणाले. तकारदार यांनी 'कमी होणार नाही का' असे विचारले असता पवार यांनी ' **नाही रे बाबा, तुम्ही सुरूवातीला काय बोलले, त्यातुन कमी करा, त्यातुन मी माझ्या हिशोबाने कमी केले,** असे म्हणाले. त्यानंतर तकारदार यांनी येवु का मग, फोन करतो तुम्हाला असे म्हणाले. त्यानंतर तकारदार व मी तेथुन निघुन आपण थांबले त्या ठिकाणी परत आलो, अशी हकीकत सांगितली. आम्ही तकारदार यांना घडलेल्या घटनेची हकीकत विचारता त्यांनी पंच नं. 1 यांनी सांगितलेल्या हकीकतीशी मिळतीजुळती हकीकत सांगितली.

त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी व्हॉईस रेकॉर्डर मधील तकारदार व लोकसेवक पवार यांचेतील ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले असता, लोकसेवक पवार यांनी तकारदार यांचेकडे त्यांचा पत्याचा क्लब सुरळित चालु ठेवण्यासाठी व क्लबवर कारवाई न करण्याच्या मोबदल्यात 5,000/–रूपये लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली असल्याचे निष्पन्न झाले.

आम्ही तकारदार यांना लाचेची रक्कम हजर करण्यास कळविले असता, त्यांनी त्यांचे बचतीतुन 5,000/– रक्कम त्यात 500 रुपये दराच्या 10 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. सदर नोटांचे नंबर कोऱ्या कागदावर लिहण्यात आले. तो कागद पंच नं. 2 यांचे कडे देण्यात आला. आम्ही सदर सापळा कारवाईमध्ये ॲन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हॉयलेट दिवा यांचे गुणधर्माबाबत माहिती देवुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक पोकॉ निमसे यांनी करुन दाखविले. तकारदार यांनी हजर केलेल्या नोटांना ॲन्थ्रासिन पावडर लावण्यात आली. सदर लाच रक्कम तकारदार यांचे शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर आम्ही तकारदार, दोन्ही पंचाना व सापळा पथकास आवश्यक त्या सुचना दिल्या. आम्ही तकारदार व पंच नं. 1 यांना कळविले की, त्यांनी मिरजगाव पोलीस स्टेशन येथे जावुन लोकसेवक पवार यांची भेट घ्यावी. पवार यांनी लाचेची रकमेची मागणी केल्यास तकारदार यांनी त्यांचे शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवलेली लाचेची रक्कम पवार यांना दयावी व लाच स्विकारले नंतरचा इशारा करावा अशा व इतर पुरक सुचना देण्यात आल्या. पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये एक नविन मेमरीकार्ड घालुन ते व्हॉईस रेकॉर्डर चालु करून तकारदार यांचे गळयात शर्टच्या आत अडकविले. तकारदार व पंच नं. 1 यांना लोकसेवक पवार यांची भेट घेण्यासाठी तकारदार यांचेकडील दुचाकी वाहनाने 15/05 वाजता रवाना केले. त्यांचे पाठोपाठ सापळा पथक रवाना होवुन मिरजगाव पोलीस स्टेशनचे आजुबाजुस सापळा लावुन थांबलो. सापळा पथक आल्याची खात्री झाल्यानंतर तकारदार व पंच नं. 1 असे वाहनावरून उतरुन मिरजगाव पोलीस स्टेशनमध्ये गेले. थोडया वेळाने तकारदार व पंच नं.1 असे पोलीस स्टेशनच्या बाहेर येवुन ईशारा न करता त्यांचेकडील दुचाकी वाहनावरून मिरजगावकडे जाणाऱ्या रोडने निघाले. त्यांचेपाठोपाठ आम्ही शासकिय वाहनाने गेलो. तकारदार यांनी त्यांचे वाहन मिरजगावातील कांतीचौक येथील नटराज ज्युस सेंटर समोर उभे केले व तकारदार आणि पंच नं. 1 असे सदर ज्युस सेंटरमध्ये जावुन बसले. आम्ही शासकिय वाहनातुन सर्वजण खाली उतरून सदर ज्युस सेंटरच्या आजुबाजुस सापळा लावुन थांबलो. थोडया वेळाने तकारदार यांनी सदर ज्युस सेंटर समोर येवुन त्यांना ठरवुन दिलेला लाच स्विकारले बाबतचा पुर्व नियोजीत इशारा 15/23 वा. दरम्यान

तकारदार यांना लाच रक्कम कोणी स्विकारली व कोठे ठेवली आहे याबाबत विचारले असता त्यांनी त्यांचे शेजारी उभ्या असलेल्या इसमाकडे बोट दाखवुन " हे पोलीस हवालदार पवार आहेत. त्यांनी आम्हाला रज्जु शेठच्या हॉटेलला बोलविले. त्यानंतर आम्ही रज्जुशेठ यांच्या नटराज ज्युस सेंटर येथे आलो. तेथे पवार हे अगोदरच बसलेले होते. त्यांनी पंचाबाबत कोण आहेत असे विचारले असता मी त्यांना पाहुणा आहे असे सांगितले. त्यानंतर मी लाचेची रक्कम त्यांचे समोर धरली असता पवार यांनी **किती आहेत?** असे विचारले, मी त्यांना **'पाच हजार आहेत'** असे म्हणालो. त्यावर पवार पोलीस यांनी ' **मागच्या महिन्यात तुम्ही म्हटले होते की पुढच्या महिन्यात सहा हजार देतो, तुम्ही असच करता, माझ लई अवघड आहे, माझा विचार केला पाहिजे तुम्ही**, असे म्हणुन त्यांनी लाचेची रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारून त्यांचे शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवुन दिली. त्यानंतर मी ज्युस सेंटर समोर येवुन लाच स्विकारलेबाबतचा ईशारा केला". असे सांगितले. त्यानंतर आम्ही सापळा पथकाच्या मदतीने पवार यांना ताब्यात घेतले. पवार यांना त्यांचे पुर्ण नाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव दिपक सर्जेराव पवार, वय 39 वर्षे, पोलीस हवालदार बक्कल नं. 1625, नेमणुक मिरजगाव पोलीस स्टेशन, ता.कर्जत, जि. अहिल्यानगर, रा. रातांजन रोड, श्री. मेहेत्रे यांचे घरात भाडयाने, मिरजगाव, ता.कर्जत, जि.अहिल्यानगर असे सांगितले. आम्ही पंच नं. 2 यांचेकरवी लोकसेवक पवार यांनी स्विकारलेल्या लाचेच्या नोटा ताब्यात घेतल्या. लाच रक्कम स्विकारलेले ठिकाण हे जास्त रहदारीचे असल्याने पुढील कामकाज कर्जत येथे शासकिय विश्रामगृह येथे जावुन करण्याचे सर्वानुमते ठरले. आम्ही तकारदार यांना आमचे पाठोपाठ येण्याबाबत सुचना दिल्या. आम्ही लोकसेवक पवार यांना पकडलेल्या स्थितीत शासकिय वाहनात बसवुन कर्जत येथील शासकिय विश्रामगृह येथे आलो. तेथे विश्रामगृहाचा एक कक्ष उपलब्ध केला. आम्ही पंच नं.2 यांचेकडे देण्यात आलेली लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता, त्यांनी त्यांचेकडील लाचेची रक्कम हजर केली. त्या '.नोटा पाहता त्यात 500/-रु. दराच्या 10 चलनी नोटा असे एकुण 5,000/- रुपये मिळुन आले. सदरचे नोंटाचे नंबर हे सापळा पुर्व पंचनाम्याचे वेळी लिहुन घेतलेल्या नोंटाच्या नंबराशी पडताळणी करता ते लोकसेवक पवार यांचे शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशातुन ताब्यात घेण्यात आलेल्या नोंटाच्या नंबराशी तंतोतंत जुळुन आले. सदर कक्षाचे सर्व लाईट बंद करून आवश्यक तो अंधार करुन त्या अंधारात अल्ट्राव्हायोलेट बॅटरीचे प्रकाशात लाचेच्या नोटा तपासल्या असता सदर नोटांच्या दोन्ही बाजुस ॲन्थ्रासिन पावडरची निळसर पांढरी चकाकी दिसुन आली. त्याच अंधारात अल्ट्राव्हायोलेट दिव्याच्या प्रकाशात लोकसेवक पवार यांचे हात व कपडे तपासले असता लोकसेवक पवार यांचे उजव्या हाताच्या बोटांच्या पेन्यांना तसेच लोकसेवक पवार यांचे अंगातील शर्टच्या समोरील डाव्या बाजुच्या खिशाच्या तोंडास व आतील बाजुस ॲन्थ्रासिन पावडरची निळसर पांढन्या रंगाची चकाकी दिसुन आली. त्याबाबतचे फोटोग्राफस् घेण्यात आले. त्यानंतर आम्ही व दोन्ही पंचानी यशस्वी सापळा कारवाई दरम्यान व्हॉईस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण ऐकले. त्यानंतर पंचनाम्याचे पुढील कामकाज शासकिय विश्रामगृहातील कक्षातकरण्यात आले.

तरी दिनांक 23/04/2026 रोजी लाचमागणी पडताळणी दरम्यान 13/18 ते 13/42 वाजेच्या दरम्यान मिरजगाव पोलीस स्टेशन, जि.अहिल्यानगर येथे लोकसेवक पवार , पोलीस हवालदार यांनी तकारदार श्री. नवले यांचेकडे त्यांचा पत्याचा क्लब सुरळित चालु ठेवण्यासाठी व क्लबवर कारवाई न करण्याच्या मोबदल्यात 5,000/-रुपये लाचेची मागणी करून सदर लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविली व दिनांक 23/04/2026 रोजी 15/05 ते 15/23 वा. दरम्यान लाचेच्या सापळा कारवाई वेळी नटराज ज्युस सेंटर, कांती चौक, मिरजगाव येथे लोकसेवक पवार यांनी तकारदार यांचेकडुन 5,000/-रुपये लाचेची रक्कम स्विकारून गुन्हेगारी स्वरूपाचे वर्तन केले म्हणुन यातील लोकसेवक दिपक सर्जेराव पवार, वय 39 वर्षे, पोलीस हवालदार बक्कल नं. 1625, नेमणुक मिरजगाव पोलीस स्टेशन, ता.कर्जत, जि.अहिल्यानगर, रा. रातांजन रोड, श्री. मेहेत्रे यांचे घरात भाडयाने, मिरजगाव, ता.कर्जत, जि.अहिल्यानगर यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे.

समक्ष

पोलीस ठाणे अमलदार
मिरजगाव.पो स्टेशन

मिरजगाव पो. स्टे
२८४/२०२६
भ्रष्टाचार प्रतिबंध
अधिनियम सन
१९८८ चे कलम
७ प्रमाणे दा.गु. 23/4/2026

( अजित त्रिपुटे )
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो,अहिल्यानगर